महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

पत्र क्र.अविमं/लेखा/ 326
दिनांक 18 /०५/२०२६

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय व
माध्यमिक शाळा, अमरावती विभाग अमरावती.

विषय:-अतिवृष्टी व पुर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पुर्णतः बाधित तालुक्यातील इ.१० वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / फी ची प्रतिपुर्ती करण्याबाबत..

संदर्भ:- 1.रा.मं./ लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपुर्ती २५-२६/१६७९ दि. १७.०४.२०२६

2.पत्र क्र.अविमं/लेखा/१७० दि.२०.०४.२०२६

3.रा.मं./ लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपुर्ती २५-२६/२०६५ दि. १५.०५.२०२६

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. ०१ व ०२ अन्वये आपणास अतिवृष्टी व पुर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पुर्णतः बाधित तालुक्यातील इ.१० वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / फी ची प्रतिपुर्ती मिळणेकरीता दि.२०/०४/२०२६ ते दि. ०२/०५/२०२६ या कालावधीत लिंकवर माहीती सादर करणेबाबत कळविलेले आहे.

सदर लिंक वर काही विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झालेली असुन,उर्वरीत बाधित विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहू नये, याकरिता पुनःश्च उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ०३ अन्वये दि.२०.०५.२०२६ ते ०५.०६.२०२६ या कालावधीत लिंक सुरु करण्यात येणार असल्याचे राज्य मंडळ पुणे यांनी कळविलेले आहे.

तेव्हा, आपण बाधित विद्यार्थ्यांची माहिती सदर लिंक वर विहीत मुदतीमध्ये सादर करावी, जेणे करुन विद्यार्थ्यी सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही,याची नोंद घ्यावी.

18.05.2026

विभागीय सचिव
अमरावती विभागीय शिक्षण मंडळ

प्रतिलिपी:- मा.सचिव,रा.मं.पुणे यांना माहितीस्तव सादर.